# सगुणा * चॅरिटेबल ट्रस्ट

निसर्ग सर्व सजीव व निर्जीव पात्रांचा निर्मिक आहे. मानव प्राण्यांची निर्मितीही निसर्गानेच केली. मानव निसर्गाचे अपत्य आहे. निसर्गात घडणाऱ्या घटनांचा मानव प्राण्यावर परिणाम होऊन मानवाच्या जाणीवा विकसित होत गेल्या. या घडणाऱ्या घटनांना मानवाने प्रतिक्रिया दिली ती मानवी वर्तनाचा भाग बनली. निसर्गात घडणाऱ्या घटनां विषयी वाटणारे आश्चर्य, भीती, उत्सुकता यातून मानवी स्वभाव घडत गेला. मानवाच्या जाणून घेण्याच्या उत्सुकतेपोटी त्याने किंवा तिने माहिती मिळवून लक्षात ठेवण्यास सुरुवात केली. ही माहिती दुसऱ्या व्यक्ती पर्यंत पोहचल्यावर ते ज्ञान झाले. उपजतच असलेल्या जाणून घेण्याच्या, अनुकरण करण्याच्या प्रेरणेतून मानवात नवनिर्मितीची प्रक्रिया घडत गेली जी मानवी जीवनाचा जगण्याचा मुळ आधार आहे. मानवाचा आजपर्यंतचा विकास हा या नवनिर्मितीच्या प्रक्रियेचा इतिहास आहे. अशा प्रकारे निसर्गामधून मिळणाऱ्या अनुभवाचे अनुकरण व त्याची पडताळणी यातुन मानवीजीवन समृद्ध होत गेले.



परत-परत तीच तीच गोष्ट करून मानव एका विशिष्ट क्रियेत प्रविण (एक्सपर्ट) झाला. त्याने किंवा तिने ज्या गोष्टीत प्राविण्य मिळवले तो त्याचा किंवा तिचा विशेष गुण बनला. याचा अर्थ असा नाही की ती क्रिया बाकीच्यांना येत नाही तर बाकीच्यांना सुद्धा ती क्रिया उपजतच शिकण्याची कला अवगत असते. परंतु शिकण्याची प्रेरणा, उपलब्ध साधनं, उपलब्ध वेळ या गोष्टींवर एखाद्या क्रियेतले प्राविण्य अवलंबून असते. थोडक्यात काय तर जन्मताच सर्व व्यक्ती या समान असतात. मग ती स्त्री (मादी-देह) असो किंवा पुरुष (नर-देह). मिळालेल्या वातावरणानुसार व साधनांच्या उपलब्धतेनुसार व्यक्तींची बांधणी होत असते. लिंग (स्त्री किंवा पुरुष), धर्म, जात, भाषा, वर्ग... या व्यक्तीच्या माणूस म्हणूनच्या बांधणीत प्रभाव टाकणाऱ्या दुय्यम गोष्टी आहेत. एखाद्या व्यक्तीत निसर्गतःच शारीरिक किंवा शरीरांतर्गत असलेली जैविक कारणांमुळे असलेली कमतरता एक वेगळी गोष्ट आहे. याच्या आधारावर व्यक्ती-व्यक्तित विषमता मानणे, एखाद्याची क्षमताचे नाकारणे हे व्यक्तिला निसर्गतःच मिळालेल्या समान हक्काच्या व निसर्ग नियमाच्या विरोधात आहे.

काही शहरी लोक 'खेडूत' हा शब्द तुच्छतेने उच्चारतात. खेडूत (ग्रामीण) लोकांना मॅनर्सलेस म्हणतात. या उलट काही ग्रामीण लोकांकडून शहरी लोकांना अप्पलपोटे, मतलबी म्हटले जाते. मुळात शहरी किंवा ग्रामीण असे भेद मानणे चुकीचे आहे. ज्याची-त्याची परिस्थितीला अनुरूप जगण्याची एक पद्धत आहे. ग्रामीण म्हणजे अमुकच आणि शहरी म्हणजे तमुकच असे मानणे अनेक गैरसमजांना मान्यता देण्या सारखे आहे. तसेच व्यक्तीच्या गुणांचे आहे. व्यक्ती आहे तशी ती तिच्या गुणांसह असते. या ठिकाणी '**सगुणा**' ही संकल्पना किंवा शब्द आखिल स्त्री जातीच्या संदर्भात, स्त्री आहे तशी तिच्या गुणांसह म्हणजेच '**सगुणा**' म्हणून वापरला आहे. या लेखात '**सगुणाचा**' प्रवास कसा सुरू झाला? तिने कुठल्या प्रश्नांची सोडवणूक केली? कशा प्रकारे केली? तिला कुठल्या अडचणी आल्या? तिचे भावी कार्यक्रम काय? या सर्व

प्रश्नांची सोडवणूक करताना स्त्रियांचे एक स्वतंत्र त्रैमासिक असावे जे ग्रामीण मुलींच्या प्रश्नांची उत्तरे शोधेल या हेतूने '**सगुणा**' नावाचे त्रैमासिक स्त्रियांमध्ये संवादाच्या दिशेने पाऊल टाकत आहे. या गोष्टीला अनुलक्षुनच '**सगुणा**' काय आहे हे समजून घेवू.



**सगुणा स्थापनेमागील पार्श्वभूमी :**

सगुणा २००० साली मुलींच्या सहभागातून सुरू झाली. सोलापूर जवळच्या बेलाटी या छोट्या गावातून गिरणी कामगारांच्या छोट्या शेतकऱ्यांच्या, दूध व्यवसाय करणाऱ्यांच्या काही मुली घरकामासाठी पुण्याला आल्या. त्यांना पुण्याला का यावे लागले? सर्व समाजाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलींना शहरात का यावे लागले? सोलापूरातल्या उरल्या-सुरल्या गिरण्या बंद पडल्या, कामगार बेकार झाले. शेतकामाचा अनुभव नसल्यामुळे कामगार शेतीत नालायक ठरला. नोकरीच्या शोधात उरले-सुरले सर्व विकून कंगाल झाला, निराशेतून व्यसनाधीन बनला. या व्यसनाधीनतेतून कामगार तर उध्वस्त झाला मात्र याची शिकार बनली ती स्त्री. रोजचे अत्याचार सुरू झाले. शेतकऱ्याची स्थिती काही वेगळी नव्हती. कोरडवाहू शेती त्यात पावसाची अनिश्चितता. मराठा म्हणूनची खोटी प्रतिष्ठा, मुलींचे लग्न, अनाठायी प्रतिष्ठेपायी केलेला खर्च, हुंडा, या सर्वातून क़र्जबाजारीपण आले. असलेली थोडी जमीनही गेली. पहिल्या मुलीच्या लग्नातच सर्व गेलं आता उरलेल्या मुलींचं करणार काय? सहकारी बँकेतून कर्ज काढून दुध व्यवसाय सुरू केला. हफ्त्याने घात केला. बँकेने घराचा लिलाव केला. होत्याचं नव्हतं झालं. मात्र या सर्व व्यवस्थेचा बळी ठरली ती स्त्री. यातील काही मुली घरकामासाठी पुण्याला आल्या. अर्धवट शिक्षण सोडलेले आणि शिक्षणाबद्दलची अनास्था यामुळे पुढचे शिक्षण राहूनच गेले. म्हणून औपचारिक शिक्षणाचा बाऊ न करता, व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहून, सन्मानाने स्वतःची रोजी-रोटी कमवू शकतील. या संकल्पनेतून सगुणा आकाराला आली.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक कुटुंबे पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरात येऊन झोपडपट्ट्या मध्ये स्थायिक होतात. पण पुढे जाऊन त्यांच्या कुटुंबातील मुला-मुलींचे शिक्षणाचे वय मागे पडते. मग हिच मुले कुटुंबाच्या गरजांसाठी मिळेल ती अंगमेहनतीची कामे करू लागतात. शिक्षण नसल्यामुळे त्यांना काही कौशल्य शिकता येत नाही. आणि कौशल्य नसल्यामुळे ती अल्प मजुरीच्या विळख्यात अडकतात. याला काही छेद देता येईल का? या विचारातून **सगुणा** कामाला लागली आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या व मोठ्या झोपडपट्ट्यांमधून वाढणाऱ्या मुली-मुले यांचा व्यवस्थित तपशील तयार करणे व सरकारी सोयी सवलती त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे काम सगुणा करत आहे. वेगवेगळी कागदपत्रे, दाखले, रेशनकार्ड हे आपल्यासाठी किरकोळ! पण त्यांच्या दृष्टीने डोंगराएवढे वाटणारे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्या बरोबर सगुणा प्रयत्न करत आहे.

आरोग्याचे, कायद्याचे, शिक्षणाचे प्रश्न सोडवण्यासाठी योजना तयार आहेत. स्वयंरोजगारांचे अनेक पर्याय उपलब्ध करून स्वतःच्या गरजा स्वतःच्या मेहनतीतून पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मुलींना मार्गदर्शन व लागेल ते सहकार्य करण्यासाठी सगुणा कटिबद्ध आहे. आमच्या सारख्याच विचार करणारे किंवा वेगळे विचार घेऊन येणारे या सर्वांचे सगुणामध्ये स्वागत आहे.

**सगुणाची उद्दिष्टे –**

सगुणाचे उद्दिष्ट महिला सक्षमीकरण असून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करणे ह्यासाठी त्यांना कौशल्य पुरवणे, साधनं पुरवणे,

आर्थिक स्वावलंबन व सामाजिक प्रतिष्ठा मिळवणे आहे. याला अनुसरून सगुणाची काही प्रमुख उद्दिष्टे आहेत –

१. ० ते २५ वयोगटातील प्रत्येक मुलीच्या जगण्याच्या, आरोग्याच्या, शिक्षणाच्या, रोजगाराच्या संदर्भातील प्रत्येक प्रश्नांवर सगुणा कार्यक्रम राबवत आहे.
२. औपचारिक शिक्षणाचा बाऊ न करता रोजगारासाठी प्रशिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध करून देणे.
३. मुलींच्या मानसिक व शारीरिक आरोग्याची जोपासना करणे.
४. जातीयवाद, लिंग भेदभाव, धर्म भेदभाव यांचा विरोध करणे, जातपात न मानणे, स्त्री–पुरुष समानता मानणे, समाजामध्ये समतेवर आधारित सर्व उपेक्षित दलित व अल्प संख्यांक लोकांसाठी जागा निर्माण करणे.
५. महाराष्ट्राच्या काना–कोपऱ्यात लोकांच्या सहभागातून सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे.
६. पारंपारिक पद्धतीमध्ये ज्या ज्या गोष्टींपासून मुलींना वंचित ठेवले आहे, त्या त्या संधी मुलींना प्राप्त करून देणे.

**सगुणातर्फे राबविण्यात येणारे कार्यक्रम –**

१. **व्यावसायिक कार्यक्रम** – पुण्यामध्ये गावठाण, झोपडपट्ट्या, छोट्या वस्त्यांमधील मुलींसाठी कौशल्य प्रशिक्षणं घेतली जातात. त्यामध्ये रांगोळी, मेहंदी, ब्यूटीपार्लर, संगणक प्रशिक्षण, इंग्रजी क्लास, तसेच फॅशन डिझायनिंग इ.

पुण्यापासून जवळ असलेला 'डोणजे' या सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या निसर्गरम्य ठिकाणी '**सगुणा**' ची कार्यसंस्था आहे. या ठिकाणी आसपासच्या ग्रामीण क्षेत्रातील मुलींना वेगवेगळ्या कौशल्य प्रशिक्षणाचे ज्ञान दिले जाते.

१. **बेसिक फॅशन डिझायनिंग** – या एक वर्ष कालावधी चालणाऱ्या कोर्सची शैक्षणिक पात्रता किमान सातवी पास आहे. यात शिवणकामाशी संबंधित पायाभूत ज्ञान दिले जाते.

२. **गार्मेंट मॅन्युफॅक्चरिंग अँड बेसिक फॅशन डिझायनिंग** – या एक वर्ष कालावधी असलेल्या कोर्सची शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी लागते. यात शिवणकामासी संबंधित पायाभूत माहिती सोबतच स्वतःचा गार्मेंट मॅन्युफॅक्चरिंग व्यवसाय कसा उभा करावा याचे प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते.

३. **कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस.ऑफिस –** या सहा महिने कालावधी असलेल्या कोर्सची शैक्षणिक पात्रता किमान आठवी पास असून यात संगणकाच्या पायाभूत ज्ञानासोबत कार्यालयीन कामासाठी आवश्यक असलेल्या संगणकीय साधनाचे व माहितीचे प्रशिक्षण दिले जाते.

कोर्सेस पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना सरकारमान्य प्रमाणपत्रे देण्यात येतात. वरिल प्रशिक्षणाच्या माध्यमातून मुलींना आर्थिक स्वावलंबन व स्वयंरोजगाराच्या दिशेने मार्गक्रमण करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

२. **आरोग्य तपासणी** :

या कार्यक्रमांतर्गत मुलींची नियमित तपासणी केली जाते. ॲनिमिया (लोहाची कमतरता), मासिक पाळीतील समस्या इ. गोष्टींवर औषधोपचार केले जातात. मुलींमध्ये आरोग्य समस्ये संदर्भात जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध चर्चासत्रे व कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

**कायदेविषयक सल्ला केंद्रे** :

मुलींना व विवाहित स्त्रियांना सामान्य व कौटुंबिक समस्या निवारणासाठी कायदेतज्ञ लोकांकडून मार्गदर्शन व योग्य सल्ला दिला जातो. तसेच प्रत्यक्ष समस्या सोडवणुकीसाठी मदत केली जाते. तसेच नवीन कायद्यांची माहिती पुरविली जाते.

**जाणीवा जागृती कार्यक्रम** :

मुलींना व विवाहित स्त्रियांना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांची व समस्यांची माहिती करून दिली जाते. स्त्रियांना आपल्या जाणिवांच्या विकासासाठी राजकीय, सामाजिक, कौटुंबिक हक्कांची जाणीव करून कायदेविषयक मार्गदर्शन केले जाते.

**सुप्त कलागुणांना वाव देणे** :

निसर्गतःच प्रत्येक व्यक्ती निर्मितीशील असते. नवनिर्मीतीचे, नाविन्याचे प्रत्येक व्यक्तीला आकर्षण असते. नवनिर्मिती हाच खरा तिच्या

जगण्याचा आधार असतो. परंतु परिस्थितीच्या रेट्याखाली अनेकजण चिरडून जातात किंवा काहींची चिरडून जाण्याची भीति असते. या भीतितून ताण-तणावातून सुटका करण्यासाठी आपल्याला स्वतः स्वतःसाठी काही वेळ काढून एखादा छंद जोपासावा लागतो. आयत्या मनोरंजनातून हा ताण-तणाव तात्पुरता कमी होतो. उलट या मनोरंजनामुळे नवीनच ताण-तणावांना सामोरे जावे लागते. या परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी जाणिवपूर्वक आपल्याला आवडणाऱ्या छंदांची जोपासना करावी लागते. छंद नवनिर्मितीचा आधार असतो. आपल्यात दडलेल्या सुप्त कलागुणांना जसे चित्रकला, मुर्तीकला, नृत्य, गायन, वादन, नकला (मिमिक्री), योग्य वेळी योग्य नाव देऊन त्यांचा विकास घडवून आणावा लागतो. यासाठी मुलींमधील सुप्त कलागुणांना पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या बंधनातून सोडवून प्रोत्साहन द्यावे लागते. मुलगी म्हणूनची भीड बाजूला सारावी लागते. आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. हे सर्व काम **'सगुणा'** छंदवर्गाच्या माध्यमातून करते.

**अंकुर :**

फळातून जमिनीवर पडलेल्या बी वर मातीचे संस्कार घेऊन अंकुर फुटतो. हळुहळु या अंकुराची वृक्ष होण्याच्या दिशेने वाटचाल होते. मातीचे संस्कार झालेल्या या डेरेदार वृक्षाला असंख्य फळं लागतात. फळं पिकतात, फळातील बी चा परत अंकुर होण्याच्या दिशेने प्रवास सुरू होतो. झाडाचे फळ, फळाची बी, बी चा अंकुर, अंकुराचे परत झाड ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि हिच निर्मिती आहे, नाविन्य आहे.

मानवी मन असेच बी सारखे संस्कारक्षम असते. संस्कारातून व्यक्तीची वाढ होत असते. निसर्गतःच व्यक्तीला आपल्यात होणाऱ्या बदलांविषयी उत्सुकता असते. मुलीही अंकुराप्रमाणेच असतात. अंकुराचे एका डेरेदार वृक्षात रुपांतर होणे अनुभवत असतात. या अंकुराला स्वतःच्या शरीरात, मनात होणाऱ्या बदलांविषयी प्रश्न पडतात. स्वतःच्या अस्तित्वाविषयी निर्माण होणाऱ्या या बदलांना जाणून घेण्याची उर्मी निर्माण होते. एखाद्या विशिष्ट गोष्टी विषयी आकर्षण, ओढ निर्माण होते. वाऱ्याशी स्पर्धा करण्याचे बळ निर्माण होते. परंतु निसर्ग नियम व समाज नियम यांच्या संघर्षातून संभ्रम निर्माण होतो. ताण-तणाव वाढतात. नाना विविध प्रश्नांनी डोके भंडावून निघते, वाटा धूसर होतात, वाट दाखवणाऱ्या वाटाड्याचा शोध सुरू होतो. या वाटाड्याचेच काम सगुणा आपल्या 'अंकुर' या कार्यक्रमात करते. यात मुलींच्या प्रश्नांना योग्य पद्धतीने खुलण्यासाठी माध्यम उपलब्ध करून देणे. समस्या सोडवणुकीसाठी योग्य मार्गदर्शन व सल्ला देण्याचे कार्य 'सगुणा' करते.




**संपर्क -**
'सगुणा' चॅरिटेबल ट्रस्ट
७, माधवलक्ष्मी अपार्टमेंट
२०७९, सदाशिव पेठ
विजयानगर कॉलनी (एस.पी. कॉलेजच्या पाठीमागे)
पुणे - ४११ ०३०
दूरध्वनी - ०२०-२४३३१७२५

'सगुणा' तंत्रनिकेतन
डोणजे, (सिंहगड पायथा)
अमृतेश्वर मंदिराजवळ
ता.मावळ, जि. पुणे
दूरध्वनी - ०२०-२४३३१७२५
मोबाईल - ९६०४७२३०७१